प्रेसनोट दि. ०८/०७/२०२१

शिधावाटप कार्यालय अंबरनाथ येथील दोन लिपीक यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाच स्विकारतांना घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | :– | अंबरनाथ पो.स्टे |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | १) लोकसेवक प्रतापसिंग उत्तमसिंग ब्रम्हणात, वय–२९ वर्षे, लिपीक, शिधा वाटप कार्यालय ४६ फ अंबरनाथ, २) लोकसेविका सौ.सुनिता सुनिल धिंदळे, वय– ३४ वर्षे, लिपीक, शिधावाटप कार्यालय ४६ फ अंबरनाथ, |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | लोकसेवक क्र. १ यांनी १,०००/–रू व लोकसेविका क्र.२ यांनी १०००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | लोकसेवक क्र. १ यांनी तडजोडीअंती ५००/–रू. तसेच लोकसेविका क्र.२ यांनी १०००/–रू लाचेची रक्कम स्विकारली |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार यांचेकडे लोकसेवक क्रमांक ०१ यांनी शिधापत्रिकेची ऑनलाईन नोंदणी करण्याकरीता प्रत्येकी दोनशे रूपये असे एकुण पाच शिधापत्रिका धारकांचे १,०००/–रू लाचेची मागणी केली. तसेच लोकसेविका क्र.०२ यांनी तक्रारदार यांचेकडे असलेल्या फाटलेल्या शिधापत्रिका जमा करून नवीन शिधापत्रिका देण्याकरीता प्रत्येक शिधापत्रिकेचे ५००/–रू याप्रमाणे दोन शिधापत्रिका धारकांचे एकुण १०००/–रूपये लाचेची मागणी केली होती. त्यामुळे तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे दि. ०७/०७/२०२१ रोजी तक्रार नोंदवली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०८/०७/२०२१रोजी पडताळणी केली असता लोकसेवकक्र. ०१ यांनी १,०००/–रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५००/–रू. तसेच लोकसेविका क्र. ०२ यांनी १०००/–रूपये लाचेची मागणी करून १०००/– रूपये लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्यावरून अेसीबी ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करून लोकसेवक १) प्रतापसिंग उत्तमसिंग ब्रम्हणात, वय–२९ वर्षे, लिपीक, शिधावाटप कार्यालय ४६ फ अंबरनाथ २) लोकसेविका सौ.सुनिता सुनिल धिंदळे, वय– ३४ वर्षे, लिपीक, शिधावाटप कार्यालय ४६ फ अंबरनाथ, यांनी अनुक्रमे ५००/–रूपये व १०००/–रूपये लाचेच्या रक्कमेचा स्विकार केल्यानंतर दिनांक ०८/०७/२०२१ रोजी १५:५६ वा. शिधावाटप कार्यालय ४६ फ अंबरनाथ येथे रंगेहात पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी– मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, सो. पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

१) संपर्कपत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेतस्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोलफ्री क्र. :– १०६४
६)दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

(उत्तम माने)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned with CamScanner